**महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)**
**महाराष्ट्र शासन**
**त्रिदलनगर समोर, येरवडा, पुणे ४११ ००६**
**Maharashtra Energy Development Agency (MEDA)**
Government of Maharashtra
Opp. Tridal Nagar, Yerwada, Pune - 411 006.

सत्यमेव जयते

MEDA महाऊर्जा

आरईएन/एसपीव्ही/२०१८-१९/हिवरे बाजार/सौर/**१७३९** दि. १९ जून, २०२०

प्रति
मे. पुणे सोलर एनर्जी प्रा. लि.,
२०६, जीईआरए जंक्शन, लुल्ला नगर,
कोंढवा, पुणे - ४११ ०४८.

**विषय :- मे. पुणे सोलर एनर्जी प्रा. लि., पुणे या कंपनीचे नाव काळया यादीत समाविष्ट करणेबाबत.**
संदर्भ :-
१. कार्यादेश क्र. REN/Solar/SPV Power Plant/2018-19/Hiware Bazar/4010 दि. ५ सप्टेंबर, २०१८.
२. कार्यादेश क्र. REN/Solar/SPV Power Plant/2018-19/Hiware Bazar/4011 दि. ५ सप्टेंबर, २०१८.

वरील विषयास अनुसरून मौजे हिवरे बाजार येथे विविध इमारतींवर एकूण १३ पारेषण संलग्न व ९ पारेषण विरहित सौर विद्युत संयंत्रे तसेच पाणी पुरवठ्यासाठीचा ५ अश्वशक्ती क्षमतेचा (AC) सौर पंप आस्थापित करण्यासाठी दि. ५ सप्टेंबर २०१८ रोजी आपणांस एकूण रु.४२,८६,२९५/- रकमेचे कार्यादेश देण्यात आले होते.

वरीलप्रमाणे आस्थापित केलेल्या विविध सौर संयंत्रांचे कार्यादेशातील अटी व शर्तीनुसार ६० टक्के रकमेचे देयक रु.२५,७१,७७४/- आपणांस अदा करण्यात आले आहे. तथापि, उर्वरित देयक अदायगी करण्यापूर्वी तांत्रिक तपासणी पथकास दि. ९ नोव्हेंबर, २०१९ रोजी सदरची संयंत्रे कार्यान्वित नसून त्यामध्ये त्रुटी असल्याचे महाऊर्जा विभागीय कार्यालय, पुणे यांनी निदर्शनास आणून दिले.

याविषयी मा. महासंचालक, मा. अपर महासंचालक तसेच महाऊर्जाच्या तांत्रिक पथकाने आस्थापित संयंत्रांची दि. २६ जून, २०१९ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली व संयंत्रामधील त्रुटींबाबत पुन:श्च आपणास सुचना देऊन संयंत्रे तात्काळ कार्यान्वित करावीत याबाबत ताकीद देण्यात आली होती. तथापि, आपण त्रूटी पूर्ततेबाबत कुठलीही कार्यवाही केली नसल्याचे ग्रामपंचायतीतील संबंधितांनी दि. ५ नोव्हेंबर, २०१९ रोजीच्या पत्रान्वये या कार्यालयास कळविले आहे.

प्रादेशिक संचालक, महाऊर्जा प्रादेशिक कार्यालय, पुणे यांनी तांत्रिक अधिकाऱ्यांसह संबंधित ठिकाणी दि. २० डिसेंबर, २०१९ रोजी भेट देऊन संयंत्रांची पाहणी केली व आपणांस संयंत्रातील आढळलेल्या त्रुटी तात्काळ दुरुस्त करुन संयंत्रे कार्यान्वित करण्याबाबत अंतिम सुचना दिली. प्रादेशिक संचालक, महाऊर्जा प्रादेशिक कार्यालय, पुणे यांनी अहवालामध्ये सूचित केल्यानुसार आस्थापित करण्यात आलेली संयंत्रे कार्यादेशातील अटी व शर्तीचा भंग करणाऱ्या व शासनाची तसेच संबंधित संस्थेची दिशाभूल व फसवणूक करणाऱ्या आहेत, याबाबतचा खुलासा मागविण्यासाठीची कारणे दाखवा नोटीस मा. महासंचालक यांच्या मान्यतेने आपणांस दि. १५ जानेवारी, २०२० रोजी निर्गमित करण्यात आली होती.

त्यानुसार आपण नोटीसचे उत्तर देताना दि. २१ जानेवारी, २०२० रोजी ई-मेल संदेशाद्वारे वैद्यकीय व आर्थिक कारणास्तव संयंत्रे दुरुस्तीस वेळ लागत असून दि. ७ फेब्रुवारी, २०२० पर्यंत संयंत्रांचे काम पूर्ण करुन अहवाल सादर करण्यात येईल असे महाऊर्जा मुख्यालयास कळविले होते. तथापि, आपण दिलेले उत्तर समर्थनीय नसल्याचे व सदर काम करण्याची इच्छा नसल्याचे दिसून येते. याबाबत आपणांस वारंवार विविध माध्यमांद्वारे (दूरध्वनी, ई-मेल संदेश, पत्र)

कळवून सुद्धा आस्थापित प्रकल्पांमध्ये सुचविलेल्या सुधारणा, दुरुस्ती व बदल आपल्यामार्फत करण्यात आलेले नाही ही अत्यंत खेदजनक बाब आहे. यामुळे लाभार्थी संस्था व महाऊर्जा यांच्या वेळेचे व आर्थिक नुकसान झालेले आहे.

यावरुन असे दिसून येते की, आपण शासनाच्या अंगिकृत संस्थेची दिशाभूल करीत असल्याचे स्पष्ट होते. अशा प्रवृत्तीला अटकाव घालण्याकरिता यापुढे महाऊर्जामार्फत आपली संस्था व प्रकल्पांना कोणतीही संमती न देणे, मौजे हिवरे बाजार येथील कामाची व्याप्ती व त्याठिकाणच्या कामाचे महत्व लक्षात घेता आपणाकडील काम रद्द करण्यात येत आहे. आपल्याला कळविल्यानुसार आस्थापित प्रकल्पांमध्ये सुचविलेल्या सुधारणा, दुरुस्ती व बदल यासाठी येणार खर्च या प्रकल्पातील महाऊर्जाकडे शिल्लक निधी व आपण जमा केलेली सुरक्षा ठेव यामधून करण्यात येणार आहे. त्याकरिता आपण जमा केलेली सुरक्षा ठेव जप्त करण्यात येत आहे.

शासनाची दिशाभूल व फसवणूक करणे या कारणाने मे. पुणे सोलर एनर्जी प्रा. लि., २०६, जीईआरए जंक्शन, लुल्ला नगर, कोंढवा, पुणे - ४११ ०४८ या कंपनीचे नाव पुढील ५ वर्षाकरिता काळ्या यादीत टाकण्यात येत आहे. यामुळे होणाऱ्या नुकसानास संपूर्णपणे आपण जबाबदार आहात. सदर कंपनीस महाऊर्जामार्फत प्रसिद्ध होणाऱ्या निविदेमध्ये सहभागी होता येणार नाही.

महाव्यवस्थापक (सौर)

प्रत :-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | सरपंच, ग्रामपंचायत हिवरे बाजार, जि. अहमदनगर. | ----- | यांना माहितीस्तव. |
| २) | सह सचिव,<br>नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार,<br>नवी दिल्ली. | ----- | यांना माहितीस्तव सादर. |
| ३) | All State Nodal Agency / DISCOM's / State Government Departments<br>------- | ----- | यांना देऊन कळविण्यात येते की मे. पुणे सोलर एनर्जी प्रा. लि., पुणे यांना आपणामार्फत प्रसिद्ध होणाऱ्या निविदेमध्ये सहभागी करुन घेण्यात येऊ नये. |
| ४) | जिल्हाधिकारी,<br>सर्व जिल्हाधिकारी कार्यालये | ----- | यांना माहितीस्तव. |
| ५) | आयुक्त / मुख्याधिकारी,<br>सर्व महानगरपालिका / नगर पंचायत / नगर परिषद | ----- | यांना माहितीस्तव. |
| ६) | मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>सर्व जिल्हा परिषद, | ----- | यांना माहितीस्तव. |
| ७) | विभागीय महाव्यवस्थापक / व्यवस्थापक,<br>सर्व महाऊर्जा विभागीय / जिल्हा कार्यालये, | ----- | यांना माहितीस्तव व योग्य कार्यवाहीस्तव. |
| ८) | महाऊर्जा संकेतस्थळ | | |